**दिनांक : 07\04\2025**

**विषय : दिनांक 6\4\25 रोजी आयोजित विशेष सर्व साधारण सभे चे वृत्तांत.**

पत्रकार नगर सोसायटीच्या 58 सभासदांनी "संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पात जी 17436 वर्ग फूट जागा समाज मंदिराच्या रूपात (For commercial use) मिळणार आहे तिचा उपयोग सध्याच्या 102 सभासदांनाच व्हावा आणि तसे एक विशेष सर्व साधारण सभा आयोजित करून ठरवावे" ह्या आशयाचे एक पत्र संस्थेच्या पंच समिती कडे 18\3\25 रोजी दिले. ह्या विषयावर वरील पत्रात खालील विकल्प प्रस्तावित केले होते.

1. नमूद केलेले व्यावसायिक क्षेत्र सध्याच्या 102 सदस्यांना प्रदान करावे.
2. ह्या व्यावसायिक क्षेत्रा ची योग्य तो मोबदला घेऊन ते आपल्या नियोजित बिल्डर ला किंवा कुठल्या तृतीय पक्षा ला विकून मिळणारी रक्कम सध्याच्या 102 सभासदांमध्ये वाटावी.
3. सध्या असलेल्या 102 सभासदांची एक संयुक्त अगर भागीदारी कंपनी बनवून सदर ची जागा तीस हस्तांतरित करावी आणि नंतर ती विक्रीस काढावी.
4. वरील विषयावर विशेष सर्वसाधारण सभा लगेच आयोजित करून त्यात घेतलेल्या निर्णया प्रमाणे त्याची नोंद सध्या प्रस्तावित Development Agreement मधे ठळक रूपात करावी.

सभासदांच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक 6\4\25 रोजी सकाळी 10 वाजता एक विशेष सर्व साधारण सभे चे आयोजन संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात केले गेले. ह्या सभे ला संस्थे चे 68 सभासद उपस्थित होते तर एक सभासद मतदानानंतर आल्या ने त्यांचे मत व्होटिंग मधे धरण्यात आले नाही. सभेच्या अध्यक्ष स्थानी श्री विजय सावंत होते.

सुरवाती ला श्री सावंत यांनी उपस्थितांचे स्वागत करून सचिव श्री विनायक पटवर्धन यांच्या कडे सभे ची सूत्र दिली. श्री पटवर्धन यांनी वरील उल्लेख केलेल्या पत्रा चे वाचन करून विशेष सर्वसाधारण चे प्रयोजन सांगितले आणि सभासदांना उल्लेखित विषयावर बोलण्यास आमंत्रित केले.

विचार मांडणाऱ्या सभासदान मधे श्री श्रीवर्धन गाडगीळ यांनी वर दिलेल्या तिन्हीविकल्पांवर प्रकाश टाकला आणि ते व्यवहारिक नाहीत असे सांगितले. त्यांनी एक मध्यम मार्ग सुचवला ज्यात समाज मंदिरा ची व्यावसायिक जागेचा एक

मजला कम्युनिटी स्पेस म्हणून सोसायटी कडेच ठेवावा आणि तीन मजले बिल्डर ला सरेंडर करावे किंवा विकावे ह्या मुळे सध्याच्या सभासदांना आर्थिक लाभ पण होईल आणि परत सोसायटी कडून जागेचा व्यावसायिक वापराने सोसायटी ला उत्पन्न पण मिळेल.

श्री हेमंत आलबल यांनी आपण पहिले जसे ठरवले आहे तसेच समाज मंदिर सोसायटी कडेच ठेवावे असा विचार मांडला.

श्री राजीव साबडे यांनी वरील तिन्ही विकल्प न्यायिक प्रक्रियेत बसत नसल्याचे, तसेच बरेच सभासदांना वाटते की त्यांना लगेच मोठी कॅश मिळेल तर तसे नसल्याचे, जागा सरेंडरचा विकल्प फक्त सभासदांपुरताच आहे तो इतर जागा सरेंडर किंव्हा विकण्यासाठी नाही असे स्पष्ट केले. त्यांनी सभासदांवर पुनर्निर्माणानंतर प्रत्येक सभासदाला येणाऱ्या मेंटेनन्स खर्चा ची पण कल्पना देऊन असल्या प्रपोजल ला मुळीच मान्यता देऊ नये असे आवाहन केले.

सचिव श्री पटवर्धन यांनी स्पष्ट केले की कायद्याने कुठल्या ही प्रकाराने ह्या कमर्शियल जागे मधून येणारे उत्पन्न सोसायटी कडेच राहणार ते सभासदांमध्ये वाटता येणार नाही. सोसायटी सभासदांना क्रेडिट नोट देऊ शकेल पण ते पण नवीन जागेचा ताबा मिळाल्यावर.

श्री महेश प्रभुदेसाई यांनी मान्य केले की हे प्रपोजल आणण्यात त्यांची मोठी भूमिका होती पण पत्रात नमूद कुठले ही ऑप्शन त्यांना आता व्यवहारिक वाटत नाही.

श्री यशवंत केंजळे यांचे मत होते की ह्या सगळ्याचा फायदा स्प्लिट युनिट धारकांना आणि नवीन येणाऱ्या सभासदांना होईल तरी ह्या विषयावर अंतिम निर्णय तातडी ने घेऊन विषय संपवावा.

श्री जयंत शाळिग्राम यांनी सांगितले की प्रत्येक वेळा काही सभासद व्यवहारिक नसताना सुद्धा काही विषय उपस्थित करतात आणि त्या मुळे पुनर्निर्माण प्रक्रीयेला खीळ बसते. हे सगळे आता थांबवावे आणि पुढे असल्या कुठल्या ही प्रपोजल ला महत्व देऊ नये जे आपल्या MOU प्रमाणे नसेल.

श्री प्रणव लेले यांनी स्पष्ट केले की आज Partly surrender of space हे सभासदांच्या भल्याचे नाही. ही जागा सोसायटी ची ॲसेट आहे ह्याचा कसा

चांगला उपयोग होऊ शकतो हे गरजेनुसार भविष्यात बघता येईल.

चर्चे नंतर सचिवांनी खालील ठराव मतदाना ला टाकला जो उपस्थित 68 सदस्यांनी  68 विरुद्ध 0 मतांनी स्वीकार केला.

प्रस्ताव :

पत्रकार नगर सोसायटी मधील सध्या प्रस्तावित / नियोजित समाज मंदिरा बाबत (Commercial Space) विचार करून 17436 चौरस फुटा चे समाज मंदिर तसेच ठेवावे व लवकरात लवकर डेव्हलपमेंट अग्रीमेंट , पॉवर ऑफ एटोर्नी आणि फ्लॅट  अलॉकेशन प्रकिया पूर्ण करावी.

सूचक : श्री श्रीवर्धन गाडगीळ

अनुमोदक : श्री जयराम देसाई आणि श्री राजीव साबडे.

पंच समिती तर्फे श्री प्रदीप नेवाळकर यांनी सभासदांना संबोधित करताना सांगितले की असल्या कुठलीही तय्यारी न करता आलेल्या प्रपोजल मुळे पुनर्निर्माण प्रक्रिये ला कशी खीळ बसते, किती एनर्जी आणि वेळ वाया जातो आणि काही निष्पन्न निघत नाही. त्यांनी सभासदांना विचारले कि सुशिक्षित असून सुद्धा आपले सभासद असल्या मागण्यांना कसे बळी पडतात, न मिळणाऱ्या पैशांच्या खोट्या लोभा पाई कुठल्या ही पत्रांवर कसे सही करतात? हे आता तरी थांबले पाहिजे नाहीतर आपला पुनर्निर्माण प्रकल्प अजून लांबत जाईल.

ह्या नंतर अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

पंच समितीच्यावतीने